क्र.मह./क-१/टे-३/जमिनबाब/कावि-७५/२०१६
मौजे सोनिवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अंबरनाथ

पत्ता :-नवीन प्रशासकीय इमारत पहिला माळा, अंबरनाथ (पश्चिम) ४२१ ५०१
दुरध्वनी क्रमांक- ०२५१- २६८८००० फॅक्स क्रमांक- ०२५१- २६८८०००
E Mail- tahambarnath@gmail.com

क्र.मह./क-१/टे-३/जमिनबाब/कावि-७५/२०१६ दिनांक २६/०८/२०१६

प्रति,
नियोजन प्राधिकारी, तथा मुख्याधिकारी,
कुळगावं बदलापुर नगरपरिषद, कुळगावं

विषयः-महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४२ अ(१) (अ) प्रमाणे वर्ग भोगवटा व भार विनिश्चीतीबाबत
मौजे- सोनिवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे
गट.नं. १२/१ क्षेत्र १३८७०.०० चौ.मी.
यापैकी क्षेत्र ४०००.०० चौ.मी.
श्री.रितेशविरेंद्र रामचरीत्र मिश्रा व इतर

संदर्भ :-१) महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एनएपी-२०१६/प्र.क्र.७/टी-१ दि.२२/०१/२०१६
२) मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र.महसूल/क-१/टे-२/विनिश्चीती/२०१६ दि. ११/०३/२०१६
३) आपलेकडील पत्र संदर्भ क्र. कुबनप / नरवि / विनिश्चिती प्रस्ताव संदर्भ क्र./२३२९/२०१५-२०१६ दिनांक २१/०३/२०१६

परिशिष्ट"अ"

महाराष्ट्र जमीन महसूलसंहिता, १९६६ च्या कलम ४२-अ (१) (अ) मधील तरतुदींन्वये जमिनीचा भोगवटा, वर्ग व भार याच्या विनिश्चितीबाबतचे प्रमाणपत्र

नियोजन प्राधिकारी, तथा मुख्याधिकारी, कुळगावं बदलापुर नगरपरिषद, कुळगावं या नियोजन प्राधिकरणाकडून मौजे सोनिवली, ता.अंबरनाथ जि. ठाणे येथील गट.नं. १२/१ क्षेत्र १३८७०.०० चौ.मी. यापैकी क्षेत्र ४०००.०० चौ.मी. या जमिनीच्या संदर्भात कलम ४२-अ (१) (अ) अन्वये विनिश्चितीसाठी प्राप्त झालेल्या संदर्भाच्या अनुषंगाने उपलब्ध अद्यावत भूमी अभिलेखांच्या आधारे सदर जमिनीसंबंधातील जमिनीचा वर्ग, जमिनीचा भोगवटा व त्यावरील भाराबाबत खालीलप्रमाणे विनिश्चिती करण्यात येत आहे.

प्रस्तूत प्रकरणी १) मा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), ठाणे यांचेकडील पत्र क्र.भूसं./मे.सें.३/एसआर-९५२ दि. २३/०५/२०१६ २) मंडळ अधिकारी बदलापुर यांचेकडील क्र.म.अ.ब./विनिश्चिती/एसआर-१२/१६ दिनांक-१७/६/२०१६, तसेच आपण प्रस्तावासोबत सादर

क्र.मह./क-१/टे-३/जमिनबाब/कावि-७५/२०१६
मौजे सोनिवली, ता. अंबरनाथ, जि. ठाणे

केलेले जमिनीचे आजरोजीचे गाव नमुना नं ७/१२ उतारे पाहता मौजे सोनिवली, ता.अंबरनाथ जि. ठाणे येथील गट.नं. १२/१ क्षेत्र १३८७०.०० चौ.मी. यापैकी क्षेत्र ४०००.०० चौ.मी. जमिनीबाबत जमिनीचा वर्ग, भोगवटादाराचे नांव (जमिनीचा भोगवटा) तसेच इतर हक्कातील नोंदीनुसार असणारा जमिनीवरील भार खालीलप्रमाणे दिसून येत आहे.

अ क्र	गावाचे नाव	ग.नं/ हि.नं	क्षेत्र (हे. आर.)	जमिनीचा वर्ग	महसुल अभिलेखानुसार असणारे भोगवटदाराचे नाव	इतर हक्कातील नोंद व जमिनीवरील भार
१	सोनिवली	१२/१	१-३१-९ पो.ख. ०-०६-८	वर्ग - १	अनिल जगन्नाथ तिवारी संजेश गोपाळ पातकर क्षेत्र ०-२०-० रितेशविरेंद्र रामचरीत्र मिश्रा क्षेत्र ०-२०-०	-

१) मौजे सोनिवली, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे येथिल गट.नं. १२/१ क्षेत्र १३८७०.००चौ.मी. यापैकी एकुण क्षेत्र ४०००.०० चौ.मी. ही जमीन भोगवटदार वर्ग-१ या धारणाधिकाराने भोगवटादार १)**श्री. अनिल जगन्नाथ तिवारी, २)श्री. संजेश गोपाळ पातकर क्षेत्र २०००.०० चौ.मी. व ३)श्री. रितेशविरेंद्र रामचरीत्र मिश्रा क्षेत्र २०००.०० चौ.मी.** यांनी धारण केली आहे.

२) सदर जमिनीच्या अद्यावत अधिकार अभिलेख्यावरुन सदर जमिनीवर कोणत्याही स्वरुपात भार नाही, असे निष्पन्न झाले आहे.

३) सदर जमिनीचा अद्यावत अधिकार अभिलेख पाहता प्रस्तूतची जमीनही अनुसूचित जमातीच्या खातेदाराची नाही.

४) सदरची विनिश्चिती ही शासन निर्णय दिनांक २२/०१/२०१६ नुसार करणेत आलेली असून आपणामार्फत विकास प्रस्ताव दाखल करणारे व्यक्ती / संस्था/ कंपनी यांनी जमिनीचे ७/१२ नुसार असणारे भोगवटदार यांचेकडून कायदेशीरीत्या विकसनाचे हक्क प्राप्त करुन घेतले असलेबाबतची खात्री प्रथम आपले स्तरावरुन करण्यात यावी.

५) प्रस्तूत प्रकरणी विषयांकीत जमिनीच्या फेरफाराबाबत / अभिलेखा बाबत कोणत्याही दिवाणी न्यायालयात किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकारी यांचे न्यायालयात दावा/अपिल सुरु नसलेबाबत अर्जदार यांचेकडून प्रतिज्ञापत्र आपले स्तरावरुन घेणेत यावे. तसेच प्रस्तावित जमीन मिळकतीबाबतचे कोणतेही अभिलेख अथवा फेरफार हे कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्द केल्यास सदरचे पत्र हे आपोआप रद्द झाले असे समजणेत येईल व त्याकरिता कोणतेही स्वतंत्र आदेश काढणेची आवश्यकता राहणार नाही. याप्रमाणे अट आपले विकास परवानगी मध्ये नमुद करण्यात यावी.

६) प्रस्तावित जमिनीबाबत ना.ज.क.धा. कायदा १९७६ / भूसंपादन/पुनर्वसन/वनाबाबतच्या तद्अनुषंगीक तरतुदीनुसार संबंधित विभागाचे/सक्षम प्राधिका-याचे अभिप्राय आवश्यकतेनुसार आपले स्तरावरुन घेणेत यावेत.

७) प्रस्तूत प्रकरणी विषयांकित जमिन कोणत्याही शासकीय विभाग अथवा महामंडळे यांचेकडील प्रकल्पांबाबतचे अधिसूचनेने/आरक्षणाने बाधीत होत आहे किंवा नाही याबाबतची खात्री आपले स्तरावरुन करणेत यावी.

८) प्रस्तावित जमिन अखंड गट.नं. / हि.नं. ची नसल्यास (जमीन पैकीची असल्यास) तसेच आपले कडे दाखल प्रस्ताव हा अखंड गट.नं./हि.नं. चा नसल्यास अशा प्रकरणी पोटहिस्सा मोजणी करणेत येऊन अधिकार अभिलेख हे अद्यावत करुन घेणे हे अर्जदार यांना बंधनकारक राहील अशी अट आपलेकडील विकास परवानगी मध्ये नमुद करण्यात यावी.

९) शासन निर्णय दि. २२/०१/२०१६ मधील निर्देशानुसार महाराष्ट्र जमिन महसूलसंहिता १९६६ चे कलम ४२ अ (१) (अ) व (ब) च्या अनुषंगाने ज्या कोणत्याही व्यक्तीला जमिनीच्या वापरामधील बदलास परवानगी देण्यात आली असेल, त्याने असा वापरातील बदल सुरु केल्यापासून ३० दिवसांच्या आत या कार्यालयास लेखी कळविणे बंधनकारक आहे. तद्नंतर कलम ४७ अ मध्ये नमुद केलेल्या दराप्रमाणे रुपांतरण कराचा आणि त्याबद्दल अकृषिक आकारणीचा भरणा करणे आवश्यक असून असा भरणा केल्यावर ३० दिवसांच्या कालावधीत सनद घेणे अनिवार्य आहे. याप्रमाणे अट आपले विकास परवानगीमध्ये नमुद करण्यात यावी.

महाराष्ट्र जमीन महसूलसंहिता, १९६६ च्या कलम १५७ अन्वये अधिकार अभिलेखातील नोंद व फेरफार नोंदवहीतील प्रमाणित नोंदही एतद्विरुध्द सिध्द करण्यात येईपर्यत किंवा त्याबद्दल नवीन नोंद कायदेशिररित्या दाखल करण्यात येईपर्यत खरी असल्याचे गृहीत धरण्यात येते, या तरतुदींच्या अधीन राहुन सदरची विनिश्चिती ही सदर जमिनीसंदर्भातील उपलब्ध अद्यावत अधिकार अभिलेख व फेरफारांची तपासणी करुन देण्यात येत आहे.

नियोजन प्राधिकरणास वरीलप्रमाणे विनिश्चिती कळविण्यात येत असलीतरी, या प्रमाणपत्रान्वये भोगवटादार वर्ग-१ या धारणाधिकाराची विनिश्चिती करण्यात आलेली जमिन भविष्यात भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराची असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यासाठी प्रचलित तरतुदी विचारात घेतल्यानंतर शासनाकडे नियमानुसार देय असणारी नजराण्याची व शासनास देय असलेली अन्य रक्कम विहित कार्यपध्दती अवलंबून संबंधित महसूल प्राधिका-याने मागणी केल्यास सदर रकमा शासनास जमा करणेही संबंधित भोगवटादाराची जबाबदारी राहील आणि हे संबंधित भोगवटादारास मान्य आहे, असे संबंधित भोगवटादार यांच्याकडून बंधपत्राच्या स्वरुपात नियोजन प्राधिकरणाने लिहून घेणे अनिवार्य राहील.

सही/-
तहसिलदार अंबरनाथ

प्रत-

श्री.रितेशविरेंद्र रामचरीत्र मिश्रा व इतर
रा.सोनिवली, ता.अंबरनाथ, जि.ठाणे.

तहसिलदार अंबरनाथ

क्र.भूसं./मे.सें.३/एसआर - ८५८
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर-३
ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे
दिनांक : २३ / ५ /२०१६.

प्रति,
तहसिलदार अंबरनाथ

विषय:- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२अ (१)(१) प्रमाणे वर्ग, भोगवटा व भार विनिश्चितीबाबत.
मौजे - सोनिवली. ता.अंबरनाथ जि. ठाणे येथील
स.नं. १२/१, क्षेत्र १३८७००.०० चौ.मी. पैकी
एकूण क्षेत्र ४०००.०० चौ.मी.

संदर्भ:- आपलेकडील पत्र क्र.महसुल/कक्ष -१/टे -३/जमिनबाब /विनीश्चीतीकरण/कावि-७५/२०१६ दि.३१/०३/२०१६

वरील विषय व संदर्भानुसार खालील सर्व्हे नंबरची जमिन भूसंपादनात येते किंवा कसे याबाबत आपण अभिप्राय मागविला आहे.

अ.क्र.	तालुका	गावाचे नांव	स.नं.	क्षेत्र (हे.आर.प्र.)
१	अंबरनाथ	सोनिवली	१२/१	१-३१-९ ०-०६-८

याबाबत इकडील उपलब्ध अभिलेख तपासले असता वरील वर्णनाची जमिन हया कार्यालयाकडून यापूर्वी संपादीत झालेली नाही. तसेच या कार्यालयात सदर जमिनीचा संपादनाचा प्रस्ताव प्रस्तावित अथवा प्रलंबित नाही.

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), २३/५/१६
मेट्रो सेंटर-३, ठाणे